# जिल्हाधिकारी कार्यालय उस्मानाबाद

(पुरवठा विभाग)

मेन रोड,उस्मानाबाद पिन कोड क्र.413501

दुरध्वनी व फॅक्स क्रमाक 02472 227305

---

क्रं.2018/.पुरवठा./कार्या-11./सी आर-01 | १५ | २०१९ दिनांक 31/01/2019

पाहा - 1. अ.ना.पु.व ग्रा.सं.वि.शासन निर्णय क्रमांक कंत्राट-1217/प्र.क्रं.98/ना.पु-16 अ, दि.8 मे 2018

2. अ.ना.पु.व ग्रा.सं.वि.शासन निर्णय क्रमांक कंत्राट-1217/प्र.क्रं.98/ना.पु-16 अ,दि.01 ऑक्टोबर 2018

3. जिल्हाधिकारी कार्यालय,(पुरवठा विभाग) उस्मानाबाद यांची शासकीय धान्य गोदामातील सन 2018 ते 2021 करिता अन्नधान्याच्या हाताळणुकीसाठी हमाल कंत्राट निश्चितीबाबत ई निविदा सुचना जा.क्रं.2018/पुरवठा/कार्या-11/सीआर-01 दि. 23/10/2018

4. मा.जिल्हाधिकारी उस्मानाबाद यांची उस्मानाबाद जिल्हयातील गोदामनिहाय 16 शासकीय धान्य गोदामातील सन 2018 ते 2021 करिता अन्नधान्याच्या हाताळणुकीसाठी हमाल कंत्राट निश्चितीबाबत ई फेर निविदा करणेबाबत मंजुर टिप्पणी दि. 31/01/2019

---

## शुध्दीपत्रक

संदर्भ क्रं. 01 च्या शासन निर्णयान्वये उस्मानाबाद जिल्हयातील 16 शासकीय धान्य गोदामातील अन्नधान्याच्या हाताळणुकीसाठी हमाल कंत्राट निश्चितीबाबत गोदाम निहाय ( उस्मानाबाद, बेंबळी, तेर, ढोकी, तुळजापूर, नळदुर्ग, लोहारा, उमरगा, मुरूम, परंडा, अनाळा, भूम, कळंब, येरमाळा, शिराढोण व वाशी ) ई निविदा **http://mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर ऑनलाईन तसेच वर्तमानपत्रात दि.26/10/2018 रोजी वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात आली होती.

तथापि शासन निर्णय 8 मे 2018 मधील मुद्या क्रं. 10.12 अन्वये सदर निविदेत प्रथम निविदेअंती तांत्रिकदृष्या (तांत्रिक कागदपत्रांच्या तपासणीअंती) 3 पेक्षा कमी ग्राहय निविदा प्राप्त झाल्याने उक्त हमाल कंत्राट निश्चितीकामी सर्व 16 शासकीय धान्य गोदामात मा. जिल्हाधिकारी उस्मानाबाद यांच्या मान्यतेवरून फेरनिविदा मागविण्यात येत आहेत.

तसेच याद्वारे यापुर्वीच्या निविदा प्रक्रियेते भाग घेतलेल्या सर्व निविदाकारांना कळविण्यात येते की, त्यांना उपरोक्त फेरनिविदेकामी निविदाप्रक्रियेत भाग घ्यावयाचा असल्यास पुन्हः नव्याने निविदा भरणे आवश्यक आहे.

(दिपा मुधोळ-मुंडे)

जिल्हाधिकारी, उस्मानाबाद